# कथालेखन

कथा ऐकणे व सांगणे हा आबालवृद्धांच्या आनंदाचा विषय आहे. विद्यार्थांच्या कल्पनाशक्ती, नवनिर्मिती व सृजनशिलतेला वाव देणारा हा विषय आहे.

'कथ्यते इति कथा!' म्हणजेच सांगितली जाते ती कथा. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथा ही आपल्या कल्पनेने, विचाराने, सृजनशीलतेने रचली जाते. ती पुर्णत: काल्पनिक किंवा सत्यघटनेवर आधारित असूनही कथेच्या रुपात मांडली जाऊ शकते. कथेतून आनंद मिळतो त्याप्रमाणे कथा विचारप्रवर्तकही असतात. कथेतून आनंदाबरोबरच विचारानांही दिशा मिळते. कथाबाजीच्या विषयाला पात्र, घटना, तर्कसंगत विचार यांनी फुलवणे हे लेखन कौशल्य आहे. लेखन कौशल्य विकसित करणे हा कथालेखन घटकाच्या अभ्यासाचा हेतू आहे.

- **उत्तम कथालेखानासाठी खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक ठरते.**

  (१) कथेला योग्य शीर्षक द्यावे. (तात्पर्य लिहिण्याची आवश्यकता नाही.)

  (२) शीर्षकावरून कथेच्या विषयाची (कथाबीजाची) कल्पना यायला हवी.

  (३) शीर्षक म्हणून सुविचार, म्हण असावी असे बंधन नाही.

  (४) कथा भूतकाळात लिहावी.

  (५) लेखनातील घटना, प्रसंगानुसार काळाचे योग्य भान राखले जाणे महत्त्वाचे आहे.

  (६) कथेला भाषेचा, घटनांचा ओघ, कालानुक्रम असणे आवश्यक आहे.

  (७) कथाबीजाला अनुसरून पात्र व त्यांचे संवाद, पात्रानुसार योग्य भाषा असावी.

  (८) कथेत प्रसंगानुसार वातावरण निर्मिती करावी.

- **कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

  (१) कथाबीजावरून कथालेखन

  (२) शीर्षकावरून कथालेखन

  (३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन.

  (४) अपूर्ण कथा पूर्ण करणे.

    (अ) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे.

(ब) उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

(५) मुद्द्यांवरून कथालेखन.

(टीप- कथालेखानासाठी वर दिलेल्या प्रकारांपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.)

१. **दिलेल्या कथेची सरुवात वाचा व त्या आधारे पुढील कथा पूर्ण करा.**

> आम्हांला उन्हाळी सुट्टी लागणार, म्हणून मी व माझी धाकटी बहीण सानिका खूप खूश होतो. त्याला कारणही तसेच होते. बाबांनी सुट्टीत महाबळेश्वरला नेण्याचे कबूल केले होते. १० मे ते १५ मे अशी ट्रिपची तारीखही नक्की ठरली होती. मी सहलीच्या आनंदात रंगून गेलो होतो. ''वैभवदादा, कॅमेरा बरोबर घ्यायचा का?'' सानिकाच्या या प्रश्नाने मी भानावर आलो. ''अगं, हो घेऊया.'', म्हणून मी पुन्हा तयारीला लागलो. बरोबर नेण्याच्या वस्तू एकत्रित करणे, महाबळेश्वरची भौगोलिक माहिती आंतरजालावरुन मिळवणे, आमचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. बघता बघता १० मे ची पहाट उजाडली. आई, बाबा, मी, सानिका सर्व तयार झालो. आवराआवरी झाली आणि सगळे निघणार एवढ्यात दारावरची बेल वाजली ... आणि ...

२. **खाली दिलेल्या मुद्यांच्या आधारे कथा लिहा.**

> एक गुणी मुलगा – बिघडलेल्या मुलाची संगत – अभ्यासावर परिणाम – वडिलांचा ओरडा – आंब्याची पेटी – सगळे आंबे सडणे – बोध

३. **खालील शब्दांच्या आधारे कथा तयार करा.**

> गाढव – मीठ – नदी – कापूस

४. **खाली कथेची सुरुवात दिलेली आहे. यावरून कथा पूर्ण करा.**

> एक पोपटविक्रेता बाजूच्या गावात पोपट पकडण्यासाठी गेला. तेथून काही पोपट पकडून त्याने आपल्या गावी विकण्यासाठी नेले. त्यांपैकी सर्व पोपट विकले गेले. मात्र एका छोटा पोपट तसाच पिंजऱ्यात दिवस कंठत होता. काही कामानिमित्त पोपटविक्रेता पुन्हा बाजूच्या गावी गेला .....

५. **खाली कथेचा शेवट दिला आहे, त्याआधारे पूर्ण कथा लिहा.**

..... अनेक दिवस लोटले, महिने, वर्षे लोटली, वाल्या कोळ्याभोवती मुंग्याचे वारुळही जमले, तरी त्याचा नामजप काही थांबला नाही. शेवटी देव त्याच्यावर प्रसन्न झाले व 'आजपासून तू वाल्या कोळी नव्हे; तर वाल्मिकी ऋषी म्हणून ओळखला जाशील' असे वरदान त्यास दिले. याच वाल्मिकींनी पुढे रामायण लिहिले.

६. **खाली कथेचे शीर्षक दिले आहे, त्यावरुन कथा लिहा.**

अति तेथे माती

७. **खाली दिलेल्या मुद्यांच्या आधारे कथा लिहा.**

अकबर बादशाह – थंड पाण्यात रात्रभर उभे राहणाऱ्यास बक्षीस – एक गरीब म्हातारा – दूरवरील दिव्याकडे पाहत पाण्यात उभा – बक्षिसाला नकार – बिरबलाचे अकबरास भोजनासाठी निमंत्रण – खिचडी – अकबरास चूक उमगणे – म्हाताऱ्यास बक्षीस.

८. **खालील कथेची सुरुवात दिली आहे, त्यावरुन कथा पूर्ण करा.**

मुलगा – काजू – अधाशीपणा – पोटदुखी

९. **खाली कथेची सुरुवात दिली आहे, त्यावरुन कथा पूर्ण करा.**

शिबी नावाचा एक राजा होता. तो दानशूरपणासाठी फार प्रसिद्ध होता. कोणीही काहीही दान मागितले, तरी शिबी राजा दान देऊन त्यास तृप्त करुनच पाठवत असे. एकदा इंद्र व अग्निदेवाला त्याची परीक्षा पाहण्याची इच्छा झाली. अग्नीने कबुतराचे, तर इंद्राने ससाण्याचे रुप घेतले.....

**१०. खाली कथेचा शेवट दिला आहे. त्याआधारे पूर्ण कथा लिहा.**

..... सिंहराजा भयभीत सशाला झाडाकडे घेऊन गेला. झाडाचे एक मोठे पान सशाच्या पाठीवर ठेवले व विचारले, ''असेच होते का ते आभाळ?'' ससा लगेच उत्तरला ''हो असेच होते.'' सशासह सर्व प्राण्यांना भित्र्या सशाचा वेडेपणा लक्षात आला. साध्या पानाला आभाळ समजून काहूर माजवल्याबद्दल ससा खजील झाला; पण आता थोडं शूर व्हायचं त्यांन ठरवलं.

**११. खाली कथेचे शीर्षक दिले आहे, त्यावरुन कथा लिहा.**

काठीने चोर पकडला

## १२. दिलेल्या कथेची सुरुवात वाचा व त्या आधारे पुढील कथा पूर्ण करा.

सूर्य उगवल्यापासून सूर्यास्तापर्यंत दिवसभर कष्ट करून राजा घराकडे परतला तो अतीव समाधानाने. शरीर थकले असले तरी मन भरले होते. थराला आलेली, वाऱ्यावर डोलणारी पिके पाहून राजाला आनंदाचे भरते येत होते.

राजा घरी आला, हात-पाय धुतले, मुलांसोबत जेवण केले. रात्री गप्पा मारता मारताच थकलेल्या शरीराचा झोपेने ताबा घेतला, तसा राजा डोळयांत उद्याचं हिरवं स्वप्न घेऊन झोपी गेला.

मध्यरात्रीच्या शांत वेळी साखरझोपेत असताना राजाला अचानक जाग आली. ती काहीशा गोंधळ, गडबड, आवाजाने. राजा बावरून उठला. लगबगीने बाहेर आला आणि हबकलाच... समोरूनच गावातील अनेक माणसे जोरजोरात हाकारा देत धावत येत होती. राजाला काय झाले ते कळेना. त्याने येणाऱ्या महिपतीला अडवले आणि --- आणि राजाही गर्दीत सामील झाला -------
-----------------------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------------------------

**१३. दिलेल्या कथेची सुरुवात वाचा व त्या आधारे पुढील कथा पूर्ण करा.**

(दिलेली अपूर्णकथा उत्तरपत्रिकेत लिहिण्याची आवश्यकता नही.)

रायपूर गावात भैरू नावाचा किराणा माल विकणारा एक दुकानदार राहत होता. तो किराणामाल खरेदी करण्यासाठी तालुक्याच्या गावी जात असे. एके दिवशी दुकानांतला किराणा माल संपला म्हणून तो तालुक्याच्या गावी माल खरेदी करण्यासाठी निघाला. थंडीचे दिवस होते. हवेत बराच गारवा होता. मजल दरमजल करीत भैरू रस्त्याने चालला होता. इतक्यात आपल्या मागेमागे कुणीतरी येत असल्याचा त्याला आवाज आला. त्याने मागे वळून पाहिले आणि -------
-----------------------------------------------------------------------------------------

**१४. खाली कथेचा शेवट दिलेला आहे. त्याची सुरुवात लिहून कथा पूर्ण करा.**

........................... प्रवासी रेल्वेगाडी बरोबर स्पर्धा करणारा ससा स्वसामर्थ्यावर खूपच खूश होता. जंगलात जाऊन नाचला काय ! बागडला काय! जोरजोरात ओरडून घोषणा करू लागला, ''मी रेल्वेपेक्षाही वेगाने धावू सकतो. सर्व प्राण्यांना सशाच्या कर्तृत्वाचे कौतुक वाटले. पण बुद्धिमान कोल्ह्याला मात्र सशाचे कर्तृत्व मान्य नव्हते. हे बघ सशा! तू जर आगगाडीबरोबर शर्यत जिंकून दाखवली तर मी मान्य करीन तुझं कर्तृत्व. सशाने होकार दिला. दुसऱ्या दिवशी कोल्ह्याच्या साक्षीने ससा आगगाडी बरोबर धावू लागला. ती गाडी मालगाडी होती. ती कुठेही थांबली नाही. सशाची अवस्था अती धावल्यामुळे वाईट झाली. शेवटी रूळाच्या बाजूच्या काटेरी जंगलात ससा पडला. जखमी झाला. आपल्या क्षमतेपेक्षा अधिक काम करण्याचे हे परिणाम! बिचारा व्यथित ससा!

**१५. खाली कथेचा पूर्वार्ध दिलेला आहे. कथेचा उत्तरार्ध लिहून कथा पूर्ण करा.**

(दिलेली कथा लिहिण्याची गरज नाही)

''आई जावं ना गं कधी तरी फिराला! किती सारखी कामातच गुंतलेली असते!'' दिवाळीच्या सणाला आलेली समीक्षा आज पुन्हा आईला म्हणत होती. निर्मालाताईंनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. विचारच करत राहिल्या. तेवढ्यात शेजारचे तात्या आले, ''वाहिनी गावातल्या सर्व बायकांना जेष्ठ नागरिक संघातर्फे परदेश वारी घडवायचा विचार आहे, येता का?' निर्मलाताई काही बोलाच्या आधी समीक्षाच म्हणाली, ''हो येणार आहे.'' समीक्षाने आपल्या भावाच्या-अविनाशच्या मदतीने लगेचच तिकीट, व्हिसा वगैरे सर्व गोष्टी पूर्ण केल्या. पुढल्याच महिन्यात जाणार होते. सर्व तयारी झाली होती. निर्मलाताई तयार झाल्या होत्या; पण फार मनापासून नाही. आता दोनच दिवस राहिले होते आणि अविनाशचा फोन आला.
..........................................................................................................................

**१६. खालील अपूर्ण कथा पूर्ण करा.**

शाळेची टण् टण् घंटा वाजली. गडबडीने सर्व विद्यार्थी बाहेर पडू लागली. वरच्या मजल्यावरुन श्रेया आणि सानिकाही धावतच बाहेर पडल्या. सीटी बसमध्ये जागा मिळत नाही म्हणून भराभर चालत होत्या. शेवटी बसथांब्याजवळ पोहोचल्या. पटापट प्रवासी चढलेत. श्रेया व सानिकाला जागा मिळाली. बस चालू झाली. गर्दीत एक आजोबा उभे होते. श्रेयाने पटकन उठून आजोबांना जागा दिली. दोन चौक पार करुन बस पुढे चालू लागली, पण थोड्याच वेळात बस थांबली. सगळ्यांना वाटले थांबली असेल थांब्यावर. पण तो थांबा नव्हता समोर प्रचंड गर्दी जमली होती बरीच वाहने अडली होती. सगळे एकमेकांना बस थांबण्याचे कारण विचारु लागले अन् ..........................................................................................

**१७. दिलेल्या कथेची सुरुवात वाचा व त्या आधारे कथा पूर्ण करा.**

आम्हांला उन्हाळी सुट्टी लागणार, म्हणून मी व माझी धाकटी बहीण सानिका खूप खूश होतो. त्याला कारणही तसेच होते. बाबांनी सुट्टीत महाबळेश्वरला नेण्याचे कबूल केले होते. १० मे ते १५ मे अशी ट्रिपची तारीखही नक्की ठरली होती. मी सहलीच्या आनंदात रंगून गेलो होतो. "वैभवदादा, कॅमेरा बरोबर घ्यायचा का? सानिकाच्या या प्रश्नाने मी भानावर आलो. "अग, हो घेऊया", म्हणून मी पुन्हा तयारीला लागलो. बरोबर नेण्याच्या वस्तू एकत्रित करणे, महाबळेश्वराची भौगोलिक माहिती आंतरजालावरून मिळवणे, आमचा उत्साह नुसता ओसंडून वाहत होता. बघता बघता १० मे ची पहाट उजाडली. आई, बाबा, मी, सानिका सर्व तयार झालो. आवराआवरी झाली आणि सगळे निघणार एवढ्यात दारावरची बेल वाजली... आणि

..........................................................................................................................

...............................................................................

**१८. खालील मुद्द्यांच्या कथा लिहा.**

वर्गातर्फे 'सुंदर हात' स्पर्धेचे आयोजन – सर्वांचा सहभाग – हात सुंदर दिसावे म्हणून प्रत्येकाने प्रयत्न – स्पर्धेचा दिवस – सर्वजण उत्सुक – मोनाचा स्पर्धेतील सहभागाला नकार – कष्टाने रापलेले न सजवलेले हात लपवणे – बाईकडून सर्वांच्या हातांचे निरीक्षण – मोनाचे हात बक्षीसपात्र -